# वेबिनार : सुरक्षित आणि किफायतशीर 'मधु-उद्योगा' विषयी सर्वंकष चर्चा

■ भरघोस प्रतिसाद ■ अभ्यासपूर्ण मांडणी ■ उद्‌बोधक प्रश्नोत्तरी



**डॉ.श्री. बी.बी. पवार**
(ज्येष्ठ कृषितज्ञ तथा संस्थापक संपादक 'पूर्वा कृषिदूत')



**श्री. संजय पवार**
(कार्यकारी संचालक : पूर्वा केमटेक प्रा.लि.)



**डॉ.श्री. भास्कर गायकवाड**
(टेक्निकल डायरेक्टर: ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रा.लि. तथा संपादक : 'पूर्वा कृषिदूत')



**श्री. नितीन कराळे**
(व्यवस्थापक : बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्र)

## 'रासायनिक कीटकनाशकांचा मधमाश्यांवर होणारा दुष्परिणाम'

रासायनिक कीटकनाशकांच्या अतिरेकी किंवा चुकीच्या वापरामुळे मधमाश्यांवर अनिष्ट परिणाम होतो. यामुळे मधमाश्यांची संख्या कमी होते तसेच त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. याचाच विचार करून 'ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रा.लि.' संचलित 'बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्रा'च्या वतीने दि. १ जुलै २०२० रोजी सकाळी ११ ते १२.३० या दरम्यान 'रासायनिक कीटकनाशकांचे मधमाश्यांवर होणारे दुष्परिणाम आणि उपाययोजना' या विषयावर वेबिनार आयोजित करण्यात आला होता.

'पूर्वा कृषिदूत' मासिकाचे संपादक तथा 'ग्रीनझोन ॲग्रोकेम'चे टेक्निकल डायरेक्टर डॉ.श्री. भास्कर गायकवाड व 'बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्रा'चे व्यवस्थापक श्री. नितीन कराळे यांनी या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.

डॉ. भास्कर गायकवाड यांनी जगामध्ये तसेच भारतात रासायनिक कीटकनाशकांचे विविध गट मधमाशीवर कशाप्रकारे विपरीत परिणाम घडवतात, याची सविस्तर माहिती दिली. रसायनांचा वापर करताना घ्यावयाची काळजी, उपाययोजना तसेच एकात्मिक कीड व्यवस्थापन यावर 'पीपीटी'च्या माध्यमातून सविस्तर मार्गदर्शनही केले.

श्री. नितीन कराळे यांनी प्रत्यक्ष शेतामध्ये मधमाश्यांच्या पेट्या ठेवल्यानंतर शेतकऱ्यांना आलेले अनुभव तसेच उपाययोजना या विषयीचा तपशील दिला. या वेबिनारमध्ये १०० पेक्षा अधिक शेतकरी तसेच युवकांनी सहभाग नोंदवला. हा वेबिनार यशस्वी करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागाचे श्री. अमोल अहिरे आणि श्री. निर्मल शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन तसेच आभार प्रदर्शन 'पूर्वा केमटेक'च्या मानव संसाधन विभागातील श्री. रुपेश ठाकरे यांनी केले.

## 'मधमाशी पालनातून रोजगार निर्मिती'

ग्रामीण भागामध्ये बेरोजगारीची मोठी समस्या आहे. रोजगार निर्मितीसाठी मधमाशी पालन व्यवसायाकडे आजपर्यंत दुर्लक्ष झालेले आहे. खरे तर या क्षेत्रात रोजगाराच्या मोठ्या संधी आहेत. याचाच विचार करून 'ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रा.लि.' संचलित 'बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्रा'च्या वतीने दि. १५ जुलै २०२० रोजी सकाळी ११ ते १.०० या दरम्यान 'मधमाशी पालनातून रोजगार निर्मिती' या विषयावर वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. 'पूर्वा केमटेक प्रा.लि.'चे कार्यकारी संचालक श्री. संजय पवार, 'ग्रीनझोन ॲग्रोकेम'चे टेक्निकल डायरेक्टर तथा 'पूर्वा कृषिदूत' मासिकाचे संपादक डॉ. भास्कर गायकवाड आणि ज्येष्ठ कृषितज्ञ व 'पूर्वा कृषिदूत' मासिकाचे संस्थापक संपादक डॉ. बी.बी. पवार यांनी या विषयावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी श्री. संजय पवार यांनी मधमाशी पालनातून रोजगार निर्मितीच्या कोणकोणत्या संधी आहेत, सर्व जगामध्ये तसेच आपल्या देशामध्ये सध्या या विषयावर कोणते कार्य चालू आहे, मधमाशी पालनातून कोणकोणते पदार्थ तयार होऊ शकतात आणि परागीभवनासाठी मधमाश्यांच्या पेट्या भाड्याने देऊन कशाप्रकारे रोजगार निर्माण होईल याबद्दल विस्तृत विवेचन केले. तसेच बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्राच्या वतीने सुरू असलेल्या विविध उपक्रमांची 'पीपीटी'च्या माध्यमातून माहिती दिली. डॉ.श्री. भास्कर गायकवाड यांनी प्रशिक्षण कार्यक्रमातून उद्योजकता विकास, प्रशिक्षणाची सोय, तसेच मधमाशी पालनाविषयीच्या शासनाच्या योजना आणि अर्थसहाय्य याबद्दल मार्गदर्शन केले. डॉ.श्री. बी.बी. पवार यांनी परागीभवन आणि रोजगाराच्या संधी; तसेच ग्राम पातळीवरील संघटनातून मधमाशी पालनाला प्रोत्साहन देण्याच्या संदर्भात विचार मांडले. सर्व तज्ञांनी श्रोत्यांच्या प्रश्नांना उत्तरे देऊन शंकानिरसन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन तसेच आभार प्रदर्शन 'पूर्वा'च्या मानव संसाधन विभागातील श्री. रुपेश ठाकरे यांनी केले तर तांत्रिक सहाय्य माहिती तंत्रज्ञान विभागातील श्री. निर्मल शिंदे आणि अमोल अहिरे यांनी केले. ■